राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमधून जिल्हा
परिषद फंड मॉनिटरींग सिस्टीम (ZPFMS)
प्रणालीचा वापर करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांकः आयटी-२०१६/प्र.क्र.५९/मातंक**

बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख: १४ ऑक्टोबर, २०२०.

**वाचा**

१) **शासन निर्णय क्र.MAS/२०१३/प्र.क्र.१४/वित्त-६,दि.५ ऑक्टोंबर, २०१३.**
२) **वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२०/प्र.क्र.५१/२० कोषा-प्रशा-५, दि.१३ मार्च, २०२०.**
३) **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांचे पत्र क्र.अर्थ/वाले/ ३१०/२०१९, दि.३०/७/२०१९.**
४) **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचे पत्र क्र.जिपना/अर्थ/अर्थसंकल्प/ २७/२०२०,दि.९/१/२०२०.**

**प्रस्तावना -**

केंद्र शासनाच्या Chief Accountant General यांनी दिलेल्या निर्देशास अनुलक्षून वित्त विभागाद्वारे Public Finance Management System राबविण्याबाबत सुचना आहेत. यास अनुलक्षून ग्रामविकास विभागतील सर्व अनुदान वाटपासाठी/निधी वितरीत करण्यासाठी सध्या प्रचलीत यंत्रणेमध्ये सुधारणा करणेबाबत विचाराधीन आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता,१९६८ मधील तरतूदीनुसार जिल्हा परिषदेचे संपूर्ण कामकाज झाल्यानंतर, योजनांची अंमलबजावणी पार पाडल्यानंतर त्या संबंधिच्या अनुदानातून झालेल्या जमा-खर्चाचे वार्षिक लेख्ये शासनाला विहीत मुदतीमध्ये सादर करणे जिल्हा परिषदांवर बंधनकारक असते. शासन स्तरावरुन प्रत्येक जिल्हा परिषदांकडे पाठपुरावा करुन सदर अहवाल प्राप्त करुन घेण्यात येतात. जिल्हा परिषद निहाय स्वतंत्रपणे प्राप्त झालेल्या अहवालांचे एकत्रिकरण करावे लागते. यामध्ये मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ आणि वेळेची आवश्यकता लागते. केंद्रीय योजनांसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त निधीचे वितरण व सनियंत्रण करण्यासाठी केंद्र शासनाने Public Finance Monitoring System (PFMS) ही

प्रणाली विकसित केली आहे. त्याच धर्तीवर जिल्हा परिषदेच्या निधीचे वितरण व संनियंत्रण प्रणालीद्वारे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. प्रस्तावित संगणकीय प्रणालीमध्ये जिल्हा परिषदांचे सर्व विभाग मुख्यालयाशी जोडले जाऊन त्यानुसार जमा व खर्चाचे नमुना नं.१३ व १४ पासून ते वार्षिक लेख्ये तयार करणेपर्यंतचे सर्व कामकाज संगणकीय प्रणालीमार्फत पार पाडले जाणे अपेक्षित आहे. सदरचे कामकाज करताना जमा व खर्चाची एकवेळ डेटा एन्ट्री केल्यानंतर पुढील कोणत्याही ठिकाणी नव्याने माहिती भरण्याची आवश्यकता राहत नाही. सदर प्रणालीमधून वर्षनिहाय प्राप्त अनुदान, झालेला खर्च, शिल्लक अनुदान यांचे लेखाशिर्षनिहाय विवरण तयार होत असल्याने अखर्चित रकमा शासनास परत करण्याची माहिती देखील तात्काळ उपलब्ध होऊ शकेल. यामुळे दैनंदिन किती रकमा अखर्चित आहेत आणि त्या खर्च करण्याविषयक नियोजनास या प्रणालीमुळे खुप मदत होते. सदर प्रणाली राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना लागू केल्यास Model Accounting System द्वारा वार्षिक लेख्ये नमुना १ ते ८ मध्ये अचूकरित्या व विहीत मुदतीत सादर करणे सोयीचे होऊन वित्तीय कामकाजात एकसारखेपणा व सुसूत्रता राहण्यास मदत होणार आहे.

**<u>शासन निर्णय -</u>**

१. केंद्र व राज्यशासनाच्या धोरणानुसार जिल्हा परिषद स्तरावरील निधीचे वितरण व संनियंत्रण करण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकसूत्रता रहावी यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र या राष्ट्रीयकृत बँकेने विकसित केलेल्या जिल्हा परिषद फंड मॉनिटरींग सिस्टीम (ZPFMS) या प्रणालीचा वापर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रणालीच्या माध्यमातून शासनास अभिप्रेत असलेले एकात्मिक वित्तीय व्यवस्था, योजनेचे व्यवस्थापन आणि देयक प्रणाली (ZPFMS) सर्व जिल्हा परिषदांमध्ये राबविण्यात येऊन त्यामध्ये एकसूत्रता राहणार आहे. सदर प्रणाली विकसीत करणे, त्याची वार्षिक देखभाल, Cloud Service इत्यादी बँक ऑफ महाराष्ट्र या राष्ट्रीयकृत बँकेकडून मोफत पुरविण्यात येईल. सदर प्रणालीद्वारे पुढीलप्रमाणे सुविधा प्राप्त होणार आहेत.

- जिल्हा परिषदेअंतर्गत सर्व योजनांची अर्थसंकल्पिय तरतूद, लेखे आणि प्रदाने यांचे पूर्णत: एकात्मिककरण.
- बँकेच्या पासबुकातील नोंदींचा ताळमेळ सदर प्रणालीद्वारे घेतला जाणार आहे. त्यामुळे व्यक्तिसापेक्ष चुका आणि विलंब टळणार आहे.
- शासनाला आवश्यक असलेले विविध अहवाल सदर प्रणालीमार्फत आपोआप तयार होणार असल्याने त्यामध्ये होणाऱ्या व्यक्तीसापेक्ष चुका आणि विलंब टळणार आहे.

- अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, CAFO तसेच इतर सर्व संबंधित अधिकाऱ्यांना डॅशबोर्डवर अद्यावत (Real Time) माहिती उपलब्ध होणार आहे.
- जिल्हा परिषद स्तरावरील कामाचे Geo-Tagging करणे तसेच Geo-Tagging केलेले फोटो व व्हिडीओ किमान ३ वर्षासाठी Cloud Server वर साठविणे बंधनकारक असेल.
- याप्रणालीमधून नमुना १ ते ८ हे मासिक/वार्षिक लेख्ये तयार करण्याची कार्यपध्दती विकसीत केली आहे. नमुना १ ते ३ हे वित्त विभागाशी निगडित असून नमुना ४ ते ८ मध्ये दायित्व, येणे-देणे स्टेशनरी, जंगम मालमत्ता, Property Register इत्यादी माहिती परिपूर्ण भरल्यानंतर शासनाने निश्चित करुन दिलेल्या नमुना ४ ते ८ मध्ये लेख्ये तयार होतात. सदर प्रणालीमुळे जिल्हा परिषदांच्या कामकाजात गतिमानता, अचूकता आणि Unique Format ठेवण्यास मदत होईल.
- ही प्रणाली संपूर्णपणे युनिकोड मराठीमध्ये असल्याने जिल्हा परिषदेतील सर्व कर्मचाऱ्यांना हाताळण्यास सुलभ आहे.
- सदर संगणकीय प्रणाली शाश्वत व यशस्विरित्या कमीतकमी १० वर्ष चालविण्याकरिता जिल्हा परिषद पूर्णपणे जबाबदार असेल.
- या व्यवस्थेमधून जिल्हापरिषदेच्या खात्यातील निधीचे वितरण करण्यासाठी संबंधित जिल्हा परिषद वेळोवेळी आवश्यक निधी कोषागारातून किंवा जिल्हा परिषदेच्या अन्य खात्यातून बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेच्या शून्याधारित कॅशबूक प्रमाणे चालू खात्यामध्ये हस्तांतरित करेल आणि बँक ऑफ महाराष्ट्र सदर निधी जास्तीत जास्त T+३ दिवसांच्या आत संबंधित कंत्राटदार/लाभार्थींच्या खात्यामध्ये हस्तांतरित करेल. सदरचे ऑनलाईन निधीचे वितरण करण्याचे अधिकार हे मुख्य लेखा व वित्त अधिकारी व उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना असतील.

३. उपरोक्त संगणक प्रणालीची चाचणी User Acceptance Test (UAT) घेण्यासाठी समिती गठीत करण्यात येईल. UAT समितीच्या मान्यतेनंतर सदर प्रणालीवरून जिल्हा परिषदेच्या निधीचे वितरण करणे बंधनकारक राहील.

४. यासाठी ग्रामविकास विभाग व बँक ऑफ महाराष्ट्र यांच्यात सामांजस्य करार (MoU) करण्यात येईल.

५. सदर प्रणालीचा वापर करण्यासाठी बँकेकडून आवश्यक ते तांत्रिक सहाय्य पुरविण्यात येईल.

६. सदर प्रणालीचा वापर करण्यासाठी शासनावर किंवा जिल्हा परिषदेवर कोणताही वित्तीय भार येणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०२०१०१३१०५७५५६०२०** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c7f82404d3bf725fa292c76bb1649f4e73505a8c846f3f83bdee9968a87f1d6c, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2020.10.16 13:35:27 +05'30'

**(प्रविण देविचंद जैन)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त,
२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
३. सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत/सा.प्र.वि).
४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
५. सर्व पंचायत समितींचे गट विकास अधिकारी.
६. सर्व उप सचिव/अवर सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान रोड, फोर्ट,मुंबई
७. उप सचिव (वित्त), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान रोड, फोर्ट,मुंबई
८. सर्व कार्यासने ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान रोड, फोर्ट,मुंबई
९. कार्यासन वित्त-६, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान रोड, फोर्ट,मुंबई
१०. निवड नस्ती, आपले सरकार कक्ष, ग्रामविकास विभाग.

प्रत माहितीसाठी

१. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव.
२. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव.
३. मा.अतिरिक्त मुख्य सचिव (ग्रामविकास) यांचे स्वीय सहाय्यक.